नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनींबाबत विशेष अभय योजना २०२४-२५ ला मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- जमीन २०२४/प्र. क्र. २८/ज-८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, १ ला मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: **२६ ऑगस्ट, २०२५**

**वाचा-**

१) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र.जमीन-२४९९/प्र.क्र.१२५/ज-८, दिनांक २३.१२.२०१५
२) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र.नझूल २०१६/प्र.क्र.१८६(अ)/ज ८, दिनांक २.३.२०१९
३) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र. नझूल २०१६/प्र.क्र.१८६ (ब)/ ज ८, दिनांक २.३.२०१९
४) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र- जमीन २०२३/ प्र.क्र.१५३/ज-८, दि. ०९.११.२०२३
५) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.जमीन/कार्या ९(१)/कावि-३२/२०२४, दि.२३.०१.२०२४.
६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग समक्रमांक्र, दि. १६.०३.२०२४

**प्रस्तावना-**

नागपूर व अमरावती विभागातील नझुल जमिनीच्या भाडेपट्टयांच्या नुतनीकरणाविषयी तसेच त्यासंदर्भातील शर्तभंग / वापरात बदल /विनापरवानगी हस्तांतरण इ. विषयाबाबत शासन निर्णय क्रमांकः- जमीन २४९९/ प्र.क्र.१२५/ज-८, दि. २३.१२.२०१५ अन्वये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे. शासन निर्णय दिनांक २३.१२.२०१५ मध्ये नझूल भाडेपट्टयाचे हस्तांतरण, वापरात बदल, शर्तभंग नियमितीकरण इ.साठी विहीत अनर्जित रक्कमेचे दर जास्त असल्याने विविध

Scanned with OKEN Scanner

घटकाकडून प्रस्तूत दर कमी करण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात येत होती. सदर मागणीचा विचार करुन सुधारीत शासन निर्णय क्र. नझुल २०१६/प्र. क्र.१८६(अ)/ज-८, दि. ०२.०३.२०१९ अन्वये अनर्जित दरात सुधारणा करण्यात आली आहे. तसेच, शासन निर्णय क्रमांकः नझुल २०१६/प्र. क्र.१८६(ब)/ज-८, दि.०२.०३.२०१९ अन्वये नागपूर व अमरावती विभागातील लिलावाव्दारे किंवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमीनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्याबाबतचा देखील निर्णय घेण्यात आला आहे.

मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४.७.२०२३ रोजी विधानमंडळ, मुंबई येथे नझुल जमिनीबाबतच्या धोरणांच्या अनुषंगाने शर्तभंग प्रकरणे, निवासी प्रयोजनार्थ भूभाडे आकारणे तसेच भोगवटादार वर्ग-१ निवासी प्रयोजनाकरिता आकारण्यात येणा-या रुपांतरीत मूल्य दरात सुधारणा करण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.११.२०२३ च्या शासन निर्णयान्वये गठीत समितीने शासनास दि.२३.०१.२०२४ रोजी आपला अहवाल सादर केला. सदर प्रकरणी नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेत्त्वावर दिलेल्या नझुल जमिनीबाबत विशेष अभय योजना राबविण्यास संदर्भाधीन क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तुत योजनेस मुदतवाढ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेली मागणी तसेच ज्या भाडेपट्टेदारांना या योजनेमध्ये आतापर्यंत विविध कारणांसाठी भाग घेता आला नाही, अशा सर्व भाडेपट्टेदाराना या योजनेत सहभागी होण्याची संधी प्राप्त



Scanned with OKEN Scanner

होण्यासाठी सदर योजनेस एक वर्ष मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास दिनांक २६ ऑगस्ट,२०२५ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

**दि.१६.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये, नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझूल जमिनीबाबत राबविण्यात आलेल्या विशेष अभय योजना सन २०२४-२०२५ ला दि.०१.०८.२०२५ ते दि.३१.०७.२०२६ या कालावधीसाठी या शासन निर्णयान्वये पुढील तरतुदींनुसार एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**तरतूदी-:**

(अ) प्रस्तुत अभय योजना ज्या नझुल जमिनी निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे-प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या आहेत, त्यांनाच लागू राहील.

(आ) प्रस्तुत सुधारित धोरण सन २०२५-२०२६ मध्ये दि. ०१.०८.२०२५ ते ३१.०७.२०२६ या कालावधीसाठीच लागू राहील.

(इ) नझुल जमिनी निवासी प्रयोजनार्थ प्रीमीयम / लिलावाद्वारे अथवा अन्य प्रकारे भाडे तत्वावर दिलेल्या आहेत, त्यांना फ्रि-होल्ड (भोगवटदार-१) करणे करिता जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील येणाऱ्या बाजारमुल्याच्या २ टक्के एवढे अधिमूल्य आकारण्यात यावे. सदर दराने जमिनी फ्रि-होल्ड करताना शासन निर्णय क्र. नझुल-२०१६३/प्र.क्र.१८६(ब)/ज-८, दि.०२.०३.२०१९ मधील परि.क्र.२, ३ व ४ मधील अटी शर्ती लागू राहतील.

(ई) थकीत भाडेपट्ट्याची अभय योजनेअंतर्गत रक्कम ०.०२ % दराने आकारणी करण्यात यावी. सदर थकीत भाडे सवलतीचा दर केवळ अभय योजना



Scanned with OKEN Scanner

कालावधीकरिता (१.८.२०२५ ते ३१.७.२०२६) लागू राहील. सवलतीच्या कालावधी समाप्तीपूर्वी भू-भाडे न भरल्यास थकीत भू-भाडे व त्यावर वार्षिक १० टक्के दराने दंडनिय व्याज आकारणी करण्यात येईल.

(उ) नझूल जमिनींच्या शर्तभंग नियमितीकरण प्रकरणांबाबत शेवटचा शर्तभंग केल्याच्या दिनांकाच्या वेळी, त्या वर्षीच्या वार्षिक दरसूची प्रमाणे जमिनीच्या बाजारमूल्याच्या १ % दराने अनर्जित रक्कम आकारण्यात यावी.

(ऊ) प्रस्तुत नझुल जमिनीकरीता निवासी प्रयोजनार्थ भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीकरीता विशेष अभय योजना समाप्तीनंतर दिनांक ०१.०८.२०२६ पासून शासन निर्णय दि. २३.१२.२०१५ व शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९ च्या तरतूदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४७१/ २०२५/व्यय-९,दिनांक २१.८.२०२५ अन्वये दिलेल्या अभिप्रायांस अनुलक्षून मा.मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२५०८२६१६०९१९५६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=F0B627B32301 94FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2025.08.26 16.10.29 +05'30'

(अश्विनी यमगर)
शासनाचे उपसचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग)यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.



Scanned with OKEN Scanner

६) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधान सभा, मुंबई
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय,मुंबई
८) अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांचे विकाअ/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२.
९) अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे विकाअ/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२.
१०) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य,पुणे
११) विभागीय आयुक्त,नागपूर / अमरावती
१२) जिल्हाधिकारी, नागपूर,चंद्रपूर,गडचिरोली,गोंदिया, भंडारा, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम
१३) मा.महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य(१),मुंबई
१४) मा.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य(२),नागपूर
१५) वित्त विभाग(व्यय-९), मंत्रालय,मुंबई-३२
१६) सर्व सह सचिव/ उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१७) निवड नस्ती, कार्यासन ज-८, मंत्रालय, मुंबई -३२.



Scanned with OKEN Scanner